**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक २९ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नसरापूर इथल्या लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणातिल आरोपीला फाशीची शिक्षा.**
2. **शिक्षक पात्रता परीक्षा पेपर फुटीच्या मुद्द्यावरुन विधानसभेत विरोधकांचा सभात्याग.**
3. **विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक येत्या बुधवारी होणार.**
4. **राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते राजेंद्र जैन यांनी घेतली राज्यसभा सदस्यत्वाची शपथ.**

---------------------------

नसरापूर शिक्षा

पुणे जिल्हयातल्या भोर तालुक्यातल्या नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्या प्रकरणातला आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली आहे. पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आज हा निर्णय दिला. आरोपीने केलेला गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि 'दुर्मीळातील दुर्मिळ' स्वरूपाचा असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. आरोपीविरोधात सादर करण्यात आलेले परिस्थितीजन्य आणि वैज्ञानिक पुरावे भक्कम असल्याचं निरीक्षण नोंदवत, केवळ वय हा शिक्षेत सवलत देण्याचा आधार ठरू शकत नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासून ५८ दिवसांत निर्णय देण्यात आल्यामुळे हा राज्यातला सर्वात वेगवान खटला ठरला आहे. या प्रकरणाच्या निकालावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं आहे. नसरापूर इथल्या बालिकेवरच्या अत्याचार आणि खून प्रकरणाचा जलद तपास आणि निकाल लावल्याबद्दल फडणवीस यांनी न्यायालय, पोलीस, आणि वकीलांचे आभार मानले आहेत. विधानसभेत त्यांनी यासंदर्भात निवेदन दिलं. या निकालामुळे सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ झाल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या निकालावर समाधान व्यक्त केलं तसंच न्यायालयाचे आभार मानले.

*(होल्ड बाईट - शिंदे - २० सेकंद)*

१ मे रोजी नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून आरोपीने तिची हत्या केली होती. त्यानंतर राज्यभरात जनक्षोभ उसळला होता.

---------------------------

विधी मंडळ

शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याप्रकरणी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज गदारोळ झाला. पेपरफुटी प्रकरणी सभागृहात स्थगन प्रस्ताव मांडू देण्याचा विरोधकांचा प्रस्ताव विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावला. पेपरफुटीशी सरकारचा थेट संबंध आहे अशी चर्चा असल्याचं सांगत याप्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला हवी अशी मागणी भास्कर जाधव यांनी केली. तर या पेपरची छपाई परराज्यात का केली असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. स्थगन प्रस्ताव मांडू न दिल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. याबाबत सरकारतर्फे सभागृहात आजच सविस्तर निवेदन केलं जाईल, असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी यावेळी सांगितलं. यंदाच्या वर्षी दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या दरम्यान कॉपी प्रकरणी १०० कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं, अशी माहिती शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिली. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून -

*(व्हॉइस कास्ट - नम्रता)*

***टीईटी पेपरफुटीचा मुद्दा विरोधी पक्षांनी आज विधानपरिषदेत देखील उपस्थित केला आणि शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, तसंच या प्रकरणाचा तपास CBIकडे द्यावा, अशी मागणी केली. शिक्षण आयुक्तांना निलंबित करावं, अशी मागणी करत विरोधकांनी हौदात उतरून घोषणाबाजी केली. यावर सभापतींनी सभागृहाचं कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब केलं. यंदा मार्च आणि एप्रिल महिन्यात राज्याच्या विविध भागांत वादळी वारा, गारपीट आणि अवकाळी पावसाचा फटका १ लाख २२ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या पिकाला बसला असून ७ लाख ९ हजार शेतकऱ्यांना ७१७ कोटी रुपये नुकसान भरपाईपोटी मंजूर करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली. राज्यातल्या सर्व शिक्षण मंडळाच्या सर्व शाळांमध्ये मराठी शिकवली जाते की नाही हे पाहण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात***

*दिली. ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातल्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं भुसे यांनी सांगितलं. कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद किंवा विलीन करण्याचा कुठलाही निर्णय सरकारने घेतला नसल्याचे शिक्षण मंत्र्यांनी लेखी उत्तरात सांगितले. राज्यात अवैध सावकारी प्रतिबंधक कायदा लागू झाल्यापासून साडे ११ हजार तक्रारी दाखल झाल्या. ८३० हेक्टर पेक्षा अधिक जमीन शेतकऱ्यांना परत दिली असून ५४९ गुन्हे दाखल केल्याची माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली. नोंदणीकृत सावकारांना शेतीसाठी तारणासह ९ टक्के आणि तारणाशिवाय १२ टक्के दराने कर्जवाटप करता येते असं सहकार मंत्र्यांनी सभागृहात सांगितलं. दरम्यान, सावकारी प्रतिबंधक कायदा असला तरी शेतकऱ्यांचं शोषण सुरूच आहे, असा आरोप विरोधकांनी केला आणि अशा सावकारांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली. आपण दुष्काळाला सामोरे जात आहोत मात्र त्यासाठी काहीच तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये दिसत नाही. २०१९ साली ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला होता, त्यांना आता कर्जमाफी मिळणार नाही, त्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. दोन लाखाच्या वर कर्ज असणाऱ्या शेतकऱ्याने प्रथम ठराविक रक्कम भरावी मग त्यास कर्जमाफी मिळणार. या एका अटीमुळे ३६ लाख शेतकरी योजनेतून बाहेर जात आहेत.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे असलेली ही कर्जमाफी इतिहासात कायम लक्षात राहावी यासाठी अटी रद्द करा अशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंतराव पाटील यांनी विधानसभेत पुरवणी मागणीवरील चर्चेदरम्यान केली. तर राज्य सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही प्रत्यक्षात शेतकऱ्यांची फसवणूक असून कर्जमाफीच्या नावाखाली केवळ आकडेवारीचा खेळ सुरू आहे, अशी टीका काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेत केली.*

---------------------------

विधानपरिषद उपसभापती निवडणूक

विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक बुधवार दिनांक १ जुलै रोजी घेण्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी केली. इच्छुक सदस्यांनी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज दाखल करावेत. त्यांची छाननी उद्या १ वाजता होईल, असं त्यांनी जाहीर केलं.

---------------------------

फार्मर कप

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या पाणी फाऊंडेशनच्या सत्यमेव जयते फार्मर कप या स्पर्धेचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ झाला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, पाणी फाऊंडेशनचे संस्थापक अभिनेता आमिर खान यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. या स्पर्धेच्या सहाव्या टप्प्यामध्ये २५ हजार ८२३ शेतकरी सहभागी होत असल्याची माहिती भरणे यांनी दिली.

----------------------------

राजेंद्र जैन

राज्यसभेवर नव्यानं निवडून आलेल्या आठ खासदारांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे तसंच महाराष्ट्रातले भंडारा -गोंदिया मतदारसंघाचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते राजेंद्र जैन यांचा त्यात समवेश आहे. राज्यसभा अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या दालनात त्यांना शपथ दिली. राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या रिक्त झालेल्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता आणि ते बिनविरोध निवडून आले. भंडारा-गोंदिया जिल्हयातले प्रमुख नेते म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र जैन हे २०१० साली भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून पहिल्यांदा विधान परिषदेवर निवडून आले होते.

----------------------------

पदभार स्वीकारला

भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी म्हणून आपली बांधिलकी ही संविधानाशीच आहे, असं नागपूरचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं.19 एप्रिलला सकल हिंदू समाज सानपाडा द्वारा आयोजित कार्यक्रमात आपण प्रबोधनात्मक भाषणासाठी गेलो होतो. अशा सामाजिक सांस्कृतिक रचनात्मक कार्यक्रमात जाऊन मार्गदर्शन आणि प्रबोधन करणे हा पोलिसिंगचाच एक भाग आहे असं ते म्हणाले. विश्वास नांगरे पाटील यांनी डॉ.रविंद्र सिंगल यांच्याकडून आज पदभार स्वीकारला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी नागपुरातील 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत अंमली पदार्थ विरोधात सुरू असलेले अभियान, महिला सुरक्षा त्याचप्रमाणे वाहतुकीची शिस्त यावर भर देणार असून कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहील असा विश्वास व्यक्त केला.

***(होल्ड बाईट - कमिशनर - ३३ सेकंद)***

----------------------------

एक महिला एक झाड

बुलढाणा जिल्ह्यातल्या खामगाव शहरात सामाजिक कार्यकर्त्या मंगला गुरव यांनी आज वटसावित्री पोर्णीमेच्या मुहुर्तावर एक महिला एक झाड ही मोहीम  राबवली. या माध्यमातून त्यांनी अनेक महिलांच्या हस्ते बोर्डी नदीच्या तीरावर वडाच्या झाडाची लागवड केली. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर विदेशी झाडांऐवजी वड, पिंपळ, उंबर, चिंच, जांभूळ, करंज आणि कडुनिंब यांसारख्या देशी वृक्षांची लागवड करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

---------------------------

एचएसआरपी

राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत उद्या म्हणजेच ३० जून आहे. या मुदतीनंतर १ जुलैपासून एचएसआरपी न बसविणाऱ्या वाहनधारकांवर पोलीस आणि परिवहन विभागाकडून मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. तसेच अशा वाहनांना हस्तांतरण, पत्ता बदल, पुनर्नोंदणी आणि परवाना नूतनीकरणासह अनेक आरटीओ सेवा मिळणार नाहीत. मात्र, ३० जूनपूर्वी एचएसआरपीसाठी अधिकृत अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे.

---------------------------

आंदोलन

भंडारा जिल्ह्यात आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शेतकरी कर्जमाफीच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. निवडणुकीपूर्वी सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देऊनही राज्य सरकारने अनेक अटी-शर्ती लावून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. सरकारने कोणत्याही अटींशिवाय सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

---------------------------

हवामान

हवामान- येत्या काही तासात गोंदिया, भंडारा आणि नागपूर जिल्ह्यात वादळी वारा आणि मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली असून, नागपुरात काही वेळापूर्वी मध्यम स्वरूपाच्या सरींनी वृष्टी केली. याशिवाय चंद्रपूर, बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यांमध्ये तुरळक  ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून

या ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने इथं वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

----------------------------